आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२४ सप्टेंबर २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- दुष्काळाची झळ पोहोचलेल्या जिल्ह्यांसाठी उद्याच मदतीचा आदेश काढण्याचं राज्य सरकारचं आश्वासन

- विविध प्रकारच्या खाद्य तेलांवरच्या आयात शुल्कात कपात, सर्वसामान्यांना ग्राहकांना लाभ देण्याचं कंपन्यांचं आश्वासन

- शेअर बाजारात जोरदार घसरण, सेन्सेक्स साडे बाराशेहून अधिक अंकांनी घसरला

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंना आज २ रौप्य आणि २ कांस्य पदक

<><><><><>

दुष्काळाची झळ पोहोचलेल्या जिल्ह्यांसाठी दुष्काळाच्या संहितेच्या ट्रिगर १ नुसार देण्यात येणाऱ्या मदतीचा आदेश उद्याच काढण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. यातून काही भाग वगळला गेल्याची शक्यता असल्याने त्यांचा समावेश तिसऱ्या ट्रिगरमध्ये करण्यात येईल, असंही ते म्हणाले. वाशीममधल्या दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर ते बोलत होते.

येत्या काळात चाराटंचाई, पाणीटंचाईबाबत उपाययोजना करून अन्नधान्याचीही मदत करावी लागेल. शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठीही थेट मदत करण्यात येईल, असंही फडणवीस म्हणाले. सर्वदूर पिकांची परिस्थिती सारखीच असल्यामुळे राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळेल, असं नियोजन केलं आहे. कर्जमाफीनंतर कर्जाची रक्कमही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. बँकांना या शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे कर्ज द्यावंच लागेल. तसंच शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली

जाईल आणि याची नोंदणी लवकरच सुरू होईल, अशी माहितीही त्यांनी दिली. रब्बीमध्ये काही ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्यावर पिकं घेण्याबाबत तपासणी केली जाईल, तसंच ही पिकं घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत केली जाईल. रोजगार उपलब्ध करण्यासाठी जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येईल. जलसाठे आटलेले असल्यानं त्यांतला गाळ काढणं, दुरुस्ती गरजेची असलेले तलाव शोधून दुरुस्ती करणं ही कामंही केली जातील, असंही मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं.

<><><><>

केंद्र सरकारनं विविध प्रकारच्या खाद्य तेलांवरच्या मूलभूत आयात शुल्कात कपात केली आहे, त्यामुळं तेलाच्या किंमती कमी होण्याची शक्यता आहे. कच्चा सूर्यफुल तेलावर आता १० ऐवजी शून्य टक्के, कच्च्या सोयाबीन तेलावर आणि कच्च्या पाम तेलावर आता १० ऐवजी ५ टक्के मूलभूत आयात शुल्क लागेल. या दरकपातीचा सर्व लाभ ग्राहकांना मिळेल यासाठी सर्व खबरदारी घेण्याचे आदेश केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयानं खाद्यतेल उद्योगातल्या सर्व कंपन्यांना दिले आहेत.

खाद्यतेल उत्पादकांच्या संघटनेनं या निर्णयाचं स्वागत केलं असून सर्वसामान्य ग्राहकांना याचा फायदा दिला जाईल, असं संघटनेनं म्हटलं आहे.

<><><><>

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या NEET-PG परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. MD, MS, DNB आणि DRNB या अभ्यासक्रमांसाठी ३० ऑगस्ट रोजी ही परीक्षा झाली होती. दोन लाख ६५ हजार ९६० उमेदवार परीक्षेला बसले होते. उमेदवारांना NBMSच्या अधिकृत संकेतस्थळावरुन गुणपत्रिका डाऊनलोड करुन घेता येईल. परीक्षेची उत्तरतालिका येत्या १ ऑक्टोबरला प्रसिद्ध होईल.

<><><><>

देशातले स्टार्टअप्स, विद्यापीठे, अभियंते, विद्यार्थी आणि तंत्रज्ञान कंपन्या देशाच्या आत्मनिर्भरता आणि संरक्षण उत्पादनाच्या ध्येयासाठी योगदान देऊ

शकतात, असं प्रतिपादन संरक्षण दलप्रमुख जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी केलं. नवी दिल्लीत एका ते आज वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. संरक्षण परिसंस्था मजबूत करण्यासाठी तंत्रज्ञान, डेटा आणि उद्योग यांच्या एकात्मतेचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. त्यांनी युद्धभूमीवर शस्त्रं टिकवून ठेवण्याची, त्यांची पुनर्भरणा करण्याची आणि दुरुस्ती करण्याची साधनं असण्याच्या गरजेवर भर दिला.

<><><><><>

नवी राष्ट्रीय वीज धोरण लवकरच जाहीर होईल, असं केंद्रीय वीज विभागाचे सचिव पंकज अगरवाल यांनी आज सांगितलं. फिक्की या उद्योजक संघटनेनं नवी दिल्लीत आयोजित केलेल्या देशातल्या वीज उद्योगांच्या दुसऱ्या परिषदेत आज ते बोलत होते. वीजविषयक नवीन राष्ट्रीय धोरणाचा मसुदा वीज मंत्रालयाने गेल्या जानेवारीत जारी केला होता. त्यावर सर्व संबंधितांकडून आलेल्या सूचना समाविष्ट करुन केंद्रीय मंत्रिमंडळासमोर तो मांडण्यात येईल, असं अगरवाल यांनी सांगितलं.

<><><><><>

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची कृत्यं ही देशविरोधी असून त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज केली. नवी दिल्लीत ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. ज्ञानेश कुमार यांनी देशाच्या राज्यघटनेवर आणि न्यायव्यवस्थेवर हल्ला केला आहे, असा आरोपही त्यांनी केला. मतदान प्रक्रियेचं रक्षण करण्याची घटनादत्त जबाबदारी निवडणूक आयोगावर आहे. ही प्रक्रिया जर उद्ध्वस्त झाली, तर कायदा आणि राज्यघटनेचं अस्तित्व धोक्यात येतं. या संस्था निरर्थक ठरतात, असंही ते म्हणाले. विविध राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभांच्या निवडणुकांमध्ये गोंधळ झाल्याची खात्री असल्याचा दावा त्यांनी केला.

<><><><><>

वित्तीय क्षेत्रातल्या कंपन्या, धातू, वाहन उद्योग आणि तेल कंपन्यांच्या समभागात जोरदार घसरण झाल्यानं आज सेन्सेक्स सुमारे साडे बाराशे अंकांनी कोसळला तर निफ्टीमध्ये पावणे ४०० हून अधिक अंकांची घसरण झाली. म्युच्युअल फंड व्यवस्थापन शुल्कावर निर्बंध, कमिशन देण्यासाठी काटेकोर नियम यासारख्या IRDAIच्या नियमांचा वित्तीय क्षेत्रातल्या कंपन्यांवर मोठा परिणाम होणार असल्याचं ही घसरण झाली. याशिवाय तेलाच्या वाढत्या किंमतीचाही परिणाम झाला. दिवसअखेर सेन्सेक्समधे आज बाराशे अठ्ठेचाळीस अंकांची घसरण झाली, आणि तो ७३ हजार ५८०वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी आज ३८४ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ६३ वर बंद झाला.

<><><><><>

यूपीआयद्वारे होणाऱ्या एकूण व्यवहारांपैकी केवळ १० टक्के रकमेच्या व्यवहारांवर शुल्क लागण्याची शक्यता आहे, असा अंदाज NPCIचे अध्यक्ष दिलीप आसबे यांनी आज मुंबईत व्यक्त केला. हे शुल्क ग्राहकांकडून वसूल केलं जाऊ नये यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं ते म्हणाले. वर्षाला १ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या उद्योगांकडून एकूण शुल्कापैकी ८० टक्के शुल्क जमा होईल. हे उद्योग क्रेडिट कार्ड स्वीकारता आणि त्यावर अतिरीक्त व्यवहार शुल्क भरतात. त्यामुळं हे उद्योग ग्राहकांवर यूपीआयवरील शुल्काचा भार टाकणार नाही, असा अंदाज त्यांनी वर्तवला.

<><><><><>

टूना मासा किंवा इतर व्यावसायिकरित्या उपलब्ध असलेले मासे खाणं टाळू नये असा सल्ला कोची इथल्या आयसीएआर केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेने दिला आहे. ब्राझीलच्या किनाऱ्याजवळच्या अटलांटिक महासागरातल्या माशांच्या अभ्यासावर स्किपजॅक टूनामध्ये परजीवी असल्याचा अहवाल प्रकाशित झाला होता. त्यानंतर हा सल्ला देण्यात आला आहे. टूनासह भारतीय किनारपट्टीवर तपासलेल्या माशांमध्ये हानिकारक परजीवी संसर्गाची कोणतीही बाह्य लक्षणं

आढळली नाहीत. इतर प्रदेशांतले असे निष्कर्ष भारतीय सागरी हद्दीत पकडलेल्या माशांना लागू करू नयेत, असंही संस्थेनं म्हटलं आहे.

<><><><>

पालघर जिल्ह्यात पाली पोशेरी गावात एका रबर कारखान्याची भिंत कोसळून तीन कामगारांचा मृत्यू झाला. त्यात दोन महिलांचा समावेश आहे. आज सकाळी १०च्या सुमाराला ही दुर्घटना झाली. या भिंतीवर क्षमतेपेक्षा जास्त सामान चढवलं गेल्यानं ती कोसळल्याची शक्यता स्थानिकांनी वर्तवली आहे.

<><><><>

जपानमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या ६व्या दिवशी देखील भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात यशस्वी कामगिरी केली. ४०० मीटर रिले स्पर्धेत पोवम्मा राजू, विशाल थेन्नरसू, विद्या रामराज आणि मनू टीस. एस. यांनी रौप्यपदक पटकावलं. भारत या स्पर्धेत १७ पदकांची कमाई करून पदकतालिकेत १५व्या स्थानावर आहे. यात १ सुवर्ण, ७ रौप्य आणि ९ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेच्या पदकतालिकेत ७८ सुवर्ण पदकांसह चीन प्रथम क्रमांकावर, २० सुवर्ण पदकांसह जपान दुसऱ्या, तर १० सुवर्ण पदकांसह दक्षिण कोरिया तिसऱ्या स्थानावर आहे. स्पर्धेतल्या भारताच्या कामगिरीविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

## व्हॉईस कास्ट

*(आशियाई स्पर्धेच्या आजच्या दिवसाची सुरुवात वुशूमध्ये रोशिबिना देवीच्या रौप्यपदकाने झाली. महिलांच्या ६० किलो 'सांडा' प्रकारात रोशिबिना देवीने रौप्यपदक पटकावलं. अंतिम सामन्यात तिला चीनच्या प्रतिस्पर्ध्याकडून  पराभव पत्करावा लागला. आशियाई क्रीडा स्पर्धेतलं हे तिचं तिसरं पदक आहे.*
*नौकानयनात पुरुषांच्या डबल स्कल्स प्रकारात सतनाम सिंग आणि सलमान खान यांनी कांस्यपदक जिंकलं. अनंतजीत सिंह नरूका आणि परीनाझ धालीवाल यांनी आज मिश्र स्कीट प्रकारात कांस्यपदक पटकावलं.*

*भारताच्या सीमा कुमारी हिनं महिलांच्या १० हजार मीटर स्पर्धेत कांस्यपदक पटकावलं.*
*टेबल टेनिसमध्ये श्रीजा अकुला-सिंड्रेला दास आणि यशस्विनी घोरपडे-दिया चितळे या भारतीय जोड्यांनी उप-उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.*
*पुरुष कबड्डीमध्ये भारतीय संघानं चिनी तैपेईच्या संघाला ३७ - २१ असं पराभूत करत उपांत्य फेरीत  प्रवेश केला आहे. या गटात भारताचा हा सलग ४ विजय असून या विजयामुळे भारताचं पुरुष कबड्डीमधलं पदक निश्चित झालं आहे. महिला कबड्डी संघानं देखील जपानच्या संघाचा ५०-२५ असा पराभव करून आपल्या गटात शीर्ष स्थान मिळवलं. )*

*//<><><><><>//*